**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७**

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. १०

सभावृत्तांत

दिनांक ०४/०१/२०१९ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१९ ची नियमित मासिक सभा शुक्रवार दिनांक ०४/०१/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१) मा. श्री. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे सदस्य

---------

याशिवाय सभेस मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे जानेवारी २०१९ ची दि. ०४/०१/२०१९ रोजीची सभा आवश्यक गणपूर्तीअभावी तहकुब करण्यात येत असुन सदर सभा माहे फेब्रुवारी २०१९ च्या सभेपूर्वी घेणेत येईल.

सही/-

(कदम शशिकांत गणपत)

**सभापती,** ड प्रभाग समिती,

ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-

(सिताराम बहुरे)

क्रमांक – ड/१३/कावि/०४/२०१९ **प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**

दिनांक – ०४/०१/२०१९ ड प्रभाग समिती

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिति,

कार्यपत्रिका क्र. १०

सभावृत्तांत

दिनांक ०१/०२/२०१९ सकाळी ११.४५ वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१९ ची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१/०२/२०१९ रोजी सकाळी ११.४५ वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ३) मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ४) मा. श्रीमती गायकवाड ममता विनायक | सदस्या |
| ५) मा. श्री. कस्पटे संदिप अरुण | सदस्य |
| ६) मा. श्री. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ७) मा.श्री. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे | सदस्य |
| ८) मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |

---------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव

२) मा. श्री. नखाते संदीप भानुदास

--------

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे क्षेत्रिय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा. बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता, विद्युत, मा. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, जलनि:सारण,मा. डी.एन. गायकवाड, उद्यान अधिक्षक, मा. व्ही.एन. देसले, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. डी.डी. पाटील, उपअभियंता, बीआरटीएस, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. भागवानी एस.ए. उपअभियंता, नगररचना, मा.

लागू ए.ए. प्र. लेखाधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. मोरे सुधीर , मा. एस.एच. खोत, मा. वर्षा कदम, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. मोरे बी.जी., कनिष्ठ अभियंता, स्थापत्य उद्यान, मा. कावळे एम.डी., मा. भालेराव एस.डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. बी.एम. मुलाणी, मा. जयवंत रोकडे, मा. ढोले बी.आर. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. सी.एम. कुंभार, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. प्रविण धुमाळ, मा. दीक्षित ए.ए., कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, मा.आर.एम. सौदाई, मा. मोरे शशिकांत, एम., मा.कोतवडेकर संदीप, मा. सरोदे व्ही.एस. आरोग्य निरीक्षक, मा. गेंगजे व्ही.एस., क्रीडा निरीक्षक, मा. चंद्रकांत मोरे, हॉर्टी. सुपरवायझर, मा.डी.एम. कोटीयाना, आरोग्य निरीक्षक, पशूवैद्यकीय विभाग, मा. ए.पी. मद्रासी, मलेरिया इन्सपेक्टर, मा. जे.व्ही. पटेल, सहा. उद्यान अधिक्षक, मा. दुदुसकर एस.एस., खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे जानेवारी २०१९ ची दिनांक दि.०४/०१/२०१९ रोजीची तहकुब सभा दि. १/०२/२०१९ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे जानेवारी २०१९ च्या तहकुब सभेचे कामकाज सुरु करण्यात आले व विषयपत्रिकेवरील खालील विषयांवर मान्यता देणेत आली.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ७ माहे ऑक्टोबर २०१८ व कार्यपत्रिका क्र. ८ माहे नोव्हेंबर २०१८ व कार्यपत्रिका क्र. ९ माहे डिसेंबर २०१८ च्या सभांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता असावी.

**मा.** सभापती : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ७ माहे ऑक्टोबर २०१८ व कार्यपत्रिका क्र. ८ माहे नोव्हेंबर २०१८ व कार्यपत्रिका क्र. ९ माहे डिसेंबर २०१८ च्या सभांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

विषय क्र. १ ठराव क्र. ३४

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. मयुर पांडुरंग कलाटे अनुमोदक : मा. विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. मयुर पांडुरंग कलाटे यांचा दि. २२/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २५ वाकड चौधरी पार्क येथील हॉरिझोन सोसायटी व स्काय लाईन सोसायटी शेजारील रस्ता हा तिन्ही बाजूने एकत्र आलेला आहे. या ठिकाणाला लँडमार्क नाही तसेच येथील नागरीकांना पत्ता सांगण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. येथील नागरीकांनी लेखी स्वरुपात मागणी

केली असुन या चौकाचे नामकरण “छत्रपती संभाजी राजे चौक” असे करण्याचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. २ ठराव क्र. ३५

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचा दि. ०६/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड पिंपळे निलख मौजे वाकड सर्व्हे नं.२५७ छत्रपती चौक कस्पटेवस्ती रस्त्याकडून मानकर चौकाच्या दिशेने जात असताना डावी बाजूस जी कॉलनी आहे त्या कॉलनीस “साबळे कॉलनी” कस्पटे वस्ती हे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. ३ ठराव क्र. ३६

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. अश्विनी विक्रम वाघमारे अनुमोदक : मा. रेखा राजेश दर्शले

संदर्भ : मा. अश्विनी विक्रम वाघमारे. यांचा दि. ०७/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २५ वाकड डांगे चौक रस्त्यावर कळमकर वस्ती ही गेल्या दोन पिढया वसलेली असुन सदर परिसराची कळमकर वस्ती अशी ओळख आहे. सदरच्या परिसरातील लोकांकडून कोणताही कार्यक्रम तसेच पत्रव्यवहार व शासकीय कामाकरीता जवळची खूण म्हणुन कळमकर वस्ती असा उल्लेख केला जातो. म्हणुन सदर सर्व्हे नं. १७३ या जागेस “कळमकर वस्ती” असे नामकरण करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------

विषय क्र. ४ ठराव क्र. ३७

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग : नगररचना विभाग

सुचक : मा. विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक : मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. विठ्ठल उर्फ नाना काटे यांचा दि. ०७/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे सौदागर येथील गोविंद यशदा चौक ते विश्वशांती कॉलनी पर्यंत रिंग रेल्वे स्टेशनसाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्र. ३७१, स.नं. ७० ते ७२, १४४ ते १४६, १४९ पै. जागेत ९.० मीटरचा रस्ता विकसित करणेबाबत माहे ऑगस्ट २०१८ च्या सभेत ठराव पारीत केलेला असुन सदर

ठरावाऐवजी पिंपळे सौदागर येथील गोविंद यशदा चौक ते आरक्षण क्र. ३७१ लगत विश्वशांती कॉलनी रस्त्यापर्यंत ९.०० मीटरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ नुसार घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

विषय क्र. ५ ठराव क्र. ३८

दिनांक: ०१/०२/२०१९ विभाग:भूमि व जिंदगी विभाग

सुचक : मा.सागर सुनिल आंगोळकर अनुमोदक :मा. संदीप अरुण कस्पटे

संदर्भ : मा. क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. डक्षेका/२/कावि/०४/२०१९ दि.०३/१/ २०१९

"संत शिरोमणी श्री सावतामाळी शेतकरी आठवडा बाजार" अभियानांतर्गत सर्व्हे नं. ६० मेन बस स्टॉप, पाण्याच्या टाकीजवळ, पिंपळे निलख येथे दर गुरुवारी दुपारी ३ ते रात्री ९ या वेळेत आठवडा बाजार भरविण्यास महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांस मनपाने निश्चित केलेल्या आठवडे बाजार धोरणातील अटी शर्तीनुसार परवानगी देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

मा. सभापती : माहे जानेवारी २०१९ चे सभेस सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे व सर्व सन्मा. सदस्यांचे आभार मानुन माहे जानेवारी २०१९ ची मासिक सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
सभापती,
ड प्रभाग समिती,रहाटणी,
पुणे - ४११०१७

सही/-
प्रशासन अधिकारी,
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी,
पुणे ४११०१७

क्रमांक :ड/१३/कावि/ १६ /२०१९
दि. १६/०२/२०१९